पद्यपाठ ८

माझ्या जन्माबद्दल

ठळक मुद्दे-

- **कवितेचे नाव-** माझ्या जन्माबद्दल
- **कवी** – भुजंग मेश्राम
- **कवितेचा प्रकार**-गद्यकाव्य
- **कवितेचा विषय**–स्वतःच्या बारश्याविषयी आईने सांगितलेल्या आठवणीला जोडून कवीने व्यक्त केलेली आईबद्दलची कृतज्ञता व शिक्षणाचे महत्व.
- **कवितेतील भाषा व विचार सैदर्य** –बोली भाषेची वैशिट्ये-अलंकार,अभिव्यक्तीचा जिवंतपणा अलंकाराचा सहज व अर्थपूर्ण वापर
- **पूरक वाचनासाठी** समांतर आशयाच्या कविता-साम्यभेद शोधन
- **उपक्रम**-विचारप्रवर्तक प्रश्न,प्रतिक्रिया लेखन,पत्रलेखन

## प्रस्तावना

मुले लहान असताना घडलेल्या अनेक प्रसंगाच्या आठवणी आई,मोठ्या झालेल्या मुलांना सांगत असते.कवीला त्याच्या बारश्याच्या वेळेची एक आठवण त्याच्या आईने संगितली. ही आठवण कवितेच्या रूपाने आपल्यासमोर आली आहे. ती वाचा व ऐका.

## माझ्या जन्माबद्दल

माझं बारसं झालं तेव्हा माय म्हणते

माझ्या पुढयात बक्कळ ववाळणी पल्डी

एक म्हणाली ,‘हा बापावानीच होईल बाई’

दुसरी म्हणते,‘ह्याच्या बंद मुठीत काय असेल बाई?’

“पोर्गा त् डिंकासारखा चिवट वाटटो् गं-”

“ह्याचं आंग तर बघ,मोळीच नुस्ती!”

ववाळणीत न पडलेली पाटीलेखणी

माझ्या हातात मायने दिली

आकाशगंगा जंगलायची : अवसेची पाटी झाली.

**आशय :**

कवी आपली आठवण सांगताना म्हणतात,“माझी आई म्हणाली होती की माझ्या बारशाच्या वेळी माझ्या पुढ्यात ‘ओवाळणी ’ म्हणून पुष्कळ भेटवस्तू पडल्या होत्या. बरश्यासाठी आलेल्या बायकांमधली एकजण म्हणाली ह्याच्या बंद मुठीत म्हणजे तळहातावरच्या रेषांमध्ये काय लपलं असेल ? तिसरी म्हणाली डिंकासारखा चिवट वाटतो आणि आणखी एकजण म्हणाली ह्याचं अंग म्हणजे नुस्ती लाकडाची मोळीच वाटते.पण ओवाळणीमध्ये पडली नव्हती अशी एक गोष्ट आईने नंतर माझ्या हातात दिली-ती म्हणजे पाटी आणि लेखणी. आईने हातात दिलेल्या या पाटीलेखणीमुळे अमावस्येच्या पाटीवर आकाशगंगेसारखी प्रकाशाची अक्षरे उमटली. म्हणजे शिक्षणामुळे आयुष्यातला अंधार दूर झाला आणि जीवन सुंदर झाले.”

**कवितेतील विचार सैदर्य:**

या बायकांच्या तोंडी असलेल्या चारीही वाक्यात उपमा आणि रूपक या अलंकारांचा वापर बायकांनी केलेला आहे. ‘बापावानीच होईल, डिंकासारखा चिवट ’,आणि ‘आंग बघ.....मोळीच नुस्ती ’ लहान बाळाच्या दिसण्याची , त्याच्या शरीराची तुलना कशाकशाशी केली आहे. ही तुलना ज्याच्याशी केली आहे ते शब्द आदिवासी बायकाच्या अनुभवविश्वातून आलेले आहेत.(डिंक,मोळी,बाप) या अलंकारांमुळे कमी शब्दात आपल्याला जे म्हणायचं ते त्या बायका नेमकेपणाने सांगू शकल्या आहेत.

‘बंद मुठ ’ह्या शब्दांनी भविष्याचं सूचन होतं.आता काहीच कळत नाही पण त्यात विलक्षण ताकत मात्र असते.आपल्या तळहातावरच्या रेषांनुसार आपलं भविष्य असतं असं म्हणतात.‘बंद मुठीत काय असेल बाई?’ या वाक्यातूनही कमी शब्दांत नेमका तसाच मोठा आशय व्यक्त करण्याची बोली भाषेची ताकद आपल्या लक्षात येते.

कवितेच्या शेवटच्या तीन ओळीत कवी या बारशाच्या आठवणीला एक वेगळे वळण देतो.ओवाळणीत न मिळालेली पाटीलेखणी आईनं पुढे कवीच्या हातात दिली आणि त्याचा परिणाम म्हणून कवीच्या आयुष्यात शिक्षणाचा प्रकाश आला.हा आशय व्यक्त करण्यासाठी ‘आकाशगंगा जंगलायची : अवसेची पाटी झाली ’ हे अतिशय अर्थपूर्ण प्रतिक कवीने वापरले आहे.त्यातून आदिवासी जीवनातला अज्ञान,निरक्षरता आणि दारिद्रय यांचा अंधार आणि त्या अंधाराला उजळवणारी शिक्षणाची  आकाशगंगा हे सगळेच आपल्या डोळयांसमोर येते आकाशगंगा रात्रीच्यावेळी चमचमणाऱ्या ताऱ्यांनी सुंदर दिसते तसेच हे जीवन सुंदर झाले..हेच या कवितेचे सैंदर्य आहे.

**उजळणी प्रश्न**

**पुढील प्रश्नंची उत्तरे ३० ते ४० शब्दांत लिहा**

१)कवीने सांगितलेली बारश्याची आठवण तुमच्या शब्दांत लिहा.

२)आदिवासींच्या जीवनाबद्दलच्या कोण कोणत्या गोष्टी या कवितेतून समजतात?

प्रश्न:२

**पुढील ओळीतील अलंकार ओळखा.**

**१) 'हा बापावानीच होईल बाई'**

**२) "पोर्गा तू डिंकासारखा चिवट वाटटो गं"**

**३) "ह्याचं आंग तर बघ,मोळीच नुस्ती!"**

**मुक्त प्रश्न**

१)पुढे दिलेली प्रा .सुरेश शिंदे यांची 'माय' ही कविता वाचा.या कवितेतील 'माय' व 'माझ्या जन्माबद्दल' या कवितेतील 'आई' यांच्यात काय 'समान' आहे असं तुला वाटतं?

२) पुढे दिलेल्या राम दोतोंडे यांची 'झोपडीचा पाचोळा' व भुजंग मेश्राम यांच्या 'सरावणा' या कविता वाच. या कवितांमधील 'आई' वेगळी आहे का?तिचे वेगळेपण काय आहे असे तुला वाटते? या तीनही कवितांमध्ये आईचा एक समान गुणधर्म दिसून येतो का?तो कोणता?

**सरावणा ( येथे ऐका)**

भुजंग मेश्राम

आकारीच्या चिकलातून पाय कहाडता कहाडता

तू येते हर्साल कर्जबाजा-यासारखा

वरतून तू दिसते झुल पांघरल्या सांड्यावानी टट्ट

आगर डंडारीतल्या रावणावानी

टेमपास सोंगासाटी मस्त!

मात्रम तुही माही जमते सुकादुकाची पिवर बोली

तुले फायलं की, मह्या पोराची आठोन होते

जो मंते, 'सरावण मासी हर्स मानसी

इकडे तिकडे चोयीकडे' - आन् झोपते वुपासी

थेला कहाचा हर्स न बिर्स?

पोट्टाच थो माहा मन्शीन त् मह्या

मनात मैनाराघो...

मी करते वुपास तापास - नवोस बिवोस

'यंदा गवताची मजुरी मिरू दे चकोट

त्यासंग अंबा-याची भाजी देसीन रोज रोज'

तू छप्पर फारून देता देता माहं फाटते कारीज

पूर वुतरल्यावर्ती तू रायते मालक : मी लवारीवानी गरीब

वुपास कराचं भूत कोणं सोडलं माले नाही मालूम

मात्रम, हामच्या गरिबासाठी कोण्तरी

सिरमंतानं तुयावानी केलेली करामत हाय!

फाय नं, कोणी, 'जेव्ली का वं' मन्लं त

तुयाकरे बोट दाकवता येते, सोम्मार ते आईतवार

कवाही धरता येते - सोरता येते

ही आमाला सवलत नोहो त् आन्की काय?

सरावणा, धातोंड्या देवावानी तू

सिवाराच्या लंकेत फिरते फुस्कारे सोरत

गवत निंता निंता मी खोसते अंबारीसाटी ओटी

गवताचा भारा होते सोस्त आन्

अंबारी करते लपालपी

माही गोस्ट सोरून दे यकडाव

पोटातलं पोर काहून राहावं वुपासी?

सणासुदीचं आवतन तू आणते अशामंदी

की वाट्टे जरो तुही लंका मीच काहून लंकेची पारबती

पोर्ग शारेत जाते बोंबलू बोंबलू

तरी गी थेले निंदनीचा मोटा अप्रूक

पर्वा बाजारात महागेल गवताचा भारा

थेत्याच घेईन कारी कारी पाटी

पोर्ग पाटीवर काडलं सिवार

इळ्यावानी धरलं लेकन

न मनल तुहं मार्बती गाणं : तू

छप्पर फोडून दे जो गा -

फक्त फोडूनोको जो माही पाटी, सरावणा!

**झोपडीचा पाचोळा** (येथे ऐका)

राम दोतोंडे

झोपडीचा पाचोळा रोज

थोडा-थोडा गळत होता

थरी पोकळ बधाटीच्या जोरावर

सडका वासा उभा होता

त्याखाली आपलं घरकुल

तू छान सजवलं होतसं

ऊगवणा-या सूर्याकडे

बीन ताटीच दार होतं

कधी चोळया, कधी गोधड्या

कधी लुगड्याचा दांड

शिवायचीय तू

मजुरीला जाता-जाता

प्रेमानं माझ्याकडं

पाहायचीस तू

अन् ‘बा’ नेमानं

ठाक-ठाक करीत होता

अधुन मधुन हातात माझ्या

हस्तीही देत होता.

शाळेत मला तूच घातलं

‘बा’चं मन नसतांनाही

ओढ्याचा सागर बनवण्याची

इच्छा होती माय तुझ्याठायी

‘बा’नं एकदा बसण्यावर बसवलं

सेवटून काढण्यासाठी हातात अस्तर दिलं

तू धावत आलीस...

ढुंगणाखालचं बसणं ओढलंस

हाताला हिसका दिलास

रापी देवाच्या फोटोवर आदळली

फोटो फुटला... मला दोन थापडा देऊन

तुला ‘बा’ धबा-धबा कुटत सुटला

आयला यवढं टोणपं झालं

त्येले धंदा तू सिकु देत न्हयीस

अशानं पोटाल्ये त्येच्या

तुकडाबी मिळणारं न्हयी

...तू सारं सहन केलंस

हातात दप्तर दिलं

पोटाला चिमटा देऊन मला शिकवलं

माझ्या जीवनाच्या

कोरडवाहू जमिनीत

तूच आधार म्हणून

बरसत राहिलीस

तू म्हणायचीस

‘लागन एखादी नवकरी तं

चिमन्यासंग गोडीनं -हायसीन

न्हयी मल्ये पण सवताहाच्या

पोटाले पोटभर तरी खासीन’

अन् ‘बा’ म्हणायचा,

‘नसतं सिकवलं अन्

धंद्यात घातल आस्त

त बरं झालं आस्त

कुत्र्यासारखी मर-मर न करता

पोटाल्ये पोटभर तरी खाल्लं आस्तं’

ही ओढा-ताण सुरूच होती

तुझी अन् ‘बा’ची माझ्यासाठी

तू गेलीस माय...आता बघ

‘बा’ उभा आहे पाठी

‘जवरोक मह्ये हातपाय चालतीन

तवरोक टाचे मारीन

मह्या जिवाचं कायीबी हो

...मी तुल्ये सिकवीन!

३)परीस्थितीमुळे शाळेत जाऊ न शकणारी काही मुले तुला माहित आहेत का ? शासन या मुलांच्या शिक्षणासाठी कशी मदत करते ते समजून घे .ही माहिती आशाच किमान एका मुलाच्या आईवडिलांना सांगाण्याचा प्रयत्न कर.